www. sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ९४ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.२९ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit ... Epaper Portal

# लोकसभेच्या ४८ जागा पूर्ण ताकदीनिशी लढवण्याचा निर्धार - एकनाथ शिंदे

## एकनाथ शिंदे राज्यभर घेणार मेळावे



**मुंबई – राज्यातील महायुती सरकारने केलेल्या कामांच्या बळावर आपल्याला मतं मागायची असून मिशन ४८ ची सुरूवात करण्यासाठी शिवसंकल्प अभियान हाती घेतले असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले. लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वत: शिवसंकल्प अभियानाद्वारे राज्यभर प्रचार मेळावे घेऊन लोकसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकणार आहेत.**

शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक आज व्हिसीद्वारे पार पडली. या बैठकीत राज्यभरातील पदाधिकारी ऑनलाइन जोडले गेले होते. या पक्ष पदाधिकाऱ्यांना वर्षा बंगल्यावरून संबोधित करताना मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी लोकसभा निवडणुकीसाठी सज्ज होण्याचे निर्देश दिले. हे प्रचारमेळावे दोन टप्प्यात पार पडणार असून त्यातील पहिला टप्पा ६ जानेवारी रोजी यवतमाळ येथुन सुरू होणार असून ११ जानेवारी रोजी छत्रपती संभाजीनगर येथील सभेने पहिल्या टप्प्यातील प्रचारदौरा पूर्ण होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात २५ जानेवारीपासून पुन्हा प्रचार मेळाव्याना पुन्हा सुरूवात होणार असून २५ जानेवारी रोजी शिर्डी येथे पहिला प्रचार मेळावा पार पडेल, तर या प्रचार मेळाव्यांचा समारोप ३० जानेवारी रोजी हातकणंगले येथे होईल. या प्रचार मेळाव्यांच्या समारोपासह पक्षाच्या वतीने कोल्हापूर येथे दोन दिवसीय विशेष महाशिबिराचे आयोजन करण्यात येणार असून त्यानंतर या शिवसंकल्प अभियानाची सांगता होणार आहे. त्याचप्रमाणे महायुतीतर्फे विभागीय प्रचार मेळावे होणार असून त्याच्या तारखाही लवकरच निश्चित करण्यात येतील असेही यावेळी शिंदे यांनी सांगितले. या शिवसंकल्प अभियानाची तयारी करण्यासाठी एक मध्यवर्ती समिती तयार करण्यात आली असून स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या साथीने या प्रचार मेळाव्यांची तयारी करण्याचे निर्देश दिले आहेत.राज्यातील लोकसभेच्या ४८ जागा पूर्ण ताकदीनिशी लढवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला असून कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करावा असे निर्देश देण्यात आले आहेत. महायुतीचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणून पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट करण्याचे आवाहन मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी पक्ष पदाधिकाऱ्यांना केले आहे. शिवसंकल्प अभियानाप्रमाणेच महायुतीच्या एकत्रित सभाही राज्यभरात आयोजित करण्यात येतील. शिवसेनेची ताकद दाखवून देण्यासाठी शिवसंकल्प अभियान यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. राज्यातील वातावरण सध्या महायुतीला सकारात्मक असून प्रत्यक्ष फिल्डवर उतरून काम करणारे सरकार अशी आपल्या सरकारची जनमानसात ओळख आहे. त्यामुळे सरकारने केलेली चांगली कामे लोकांपर्यंत पोहचवून आपल्याला मते मागायची असल्याचे शिंदे यांनी या बैठकीत सांगितले. 'शासन आपल्या दारी'च्या माध्यमातून आतापर्यंत २ कोटी ७४ लाख लोकांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यात आले आहेत. एसटीमध्ये महिलांना ५० टक्के सवलत दिलेली आहे. महात्मा फुले आरोग्यदायी योजनेची मर्यादा दीड लाखांवरून ५ लााखांपर्यंत वाढवण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या बाबतीत १ रूपयात पीक विमा काढून त्यातील अडीच हजार कोटींचे अग्रीम वाटप करण्यात आले आहे. केंद्र सरकारकडून ६ हजार आणि राज्य सरकारकडून ६ असे १२ हजार शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय घेतला आहे, राज्यात ६५ सिंचन प्रकल्पांना सुप्रमा देण्याचा निर्णय घेतला आहे. आगामी काळात आरोग्य आपल्या दारी, महिला बचतगट सक्षमीकरण अभियान, सरपंच आणि ग्रामदूत अभियान राबवण्यात येणार असल्याचे सांगितले. मुंबईत राबवण्यात येत असलेले संपूर्ण स्वच्छता अभियान आगामी काळात राज्यभर राबवण्यात येणार आहे. राज्य सरकारचे हे निर्णय सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचावेत यासाठी 'एलईडी व्हॅन'च्या माध्यमातून प्रत्येक गावागावात फिरवून सरकारच्या कामाबद्दल सकारात्मक वातावरणनिर्मिती करण्यात येणार असल्याचे शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# दारुबंदी असलेल्या गडचिरोलीत दारुची तस्करी जोरात

## बाईकच्या पेट्रोल टँकमधून दारूची तस्करी

**गडचिरोली । प्रतिनिधी**

दारूबंदी असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात दारूची छुप्या मार्गाने वाहतूक करण्यासाठी वेगवेगळ्या शक्कल लढविल्या जातात. अशाच दोन बहाद्दर युवकांनी बाईकच्या पेट्रोल टँकमध्ये पेट्रोल ऐवजी चक्क दारूच्या अनेक बाटल्या लपवल्याचे आढळले.दोन आरोपी चामोर्शी येथे मोटरसायकलने दारूची वाहतूक करत होते. याची कुणकुण लागताच पोलिसांनी चामोर्शीतील जुन्या आदिवासी मुलींच्या वसतिगृहाजवळ सापळा लावून त्या दोघांना ताब्यात घेतले. बाईकच्या पेट्रोल टँकमधून एकामागोमाग एक दारूच्या बाटल्या निघतच असल्याने टँकमध्ये पेट्रोल आहे की नाही, आणि नसेल तर गाडी चालत



कशी होती, असा प्रश्न उपस्थितांना पडला होता.पोलिसांनी यासंदर्भात विचारले तेव्हा पेट्रोल टँक गाडीच्या डिक्कीत बनवण्यात आल्याचे दिसून आले. पेट्रोल पुरवठ्याचा पाईप तेथून इंजिनला जोडलेला होता. दारूची वाहतूक करण्यासाठी या बहाद्दरांनी

**“ आता ३१ डिसेंबर जवळ आल्याने दारूची अनधिकृत वाहतूक वाढली आहे. त्याला आळा घालण्यासाठी पोलिस अधीक्षक निलोत्पल यांच्या मार्गदर्शनात चामोर्शी पोलिसांनी विशेष मोहीम उघडली आहे. छुप्या पद्धतीने दारूची वाहतूक करणाऱ्यांचे मनसुबे साध्य होऊ नये यासाठी पोलिस दलाने देखील त्यांचे गोपनीय बातमीदार सक्रिय केले आहेत.**

लढविलेली ही शक्कल पाहून चामोर्शी ठाण्याचे पोलिसही चक्रावून गेले. बाईक आणि दारूच्या बाटल्या जप्त करून दोघांवरही गुन्हा दाखल करण्यात आला.

# जेसीबिने रेतीचे अवैध उत्खणन करताना गावकऱ्यांनी अडवले: तस्करांनी सरपंचासह गावकऱ्यांनाच झोडपले

## गोंडपिपरी तालुक्यात रेती तस्करांचा सरपंचावर जीवघेणा हल्ला:दोघे गंभीर जखमी

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

गोंडपिपरी तालुक्यातील वादग्रस्त 'कुलथा' घाटावर गुंड प्रवृत्तीच्या रेतितस्करांचा दि.(२८) बुधवारी रात्री १ वाजता दरम्यान गावकऱ्यांनी जेसीबी व पोकलेन नदिघाटात टाकायला अडवल्याननंतर तस्करांनी गावकऱ्यांवर चाकू व लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला केला.हल्ल्यात सरपंचासह महिलांना मारहाण करण्यात आली.तारडाचे सरपंच तरुण गंगाराम उमरे,तमुस अध्यक्ष चंद्रशेखर सुधाकर लखमापुरे गंभीर जखमी झाल्याची खळबळजनक घटना घडली. गोंडपिपरी तालुक्यातील कुलथा रेती घाटासह अनेक घाटावरून रात्रीच्या सुमारास जेसीपी आणि पोकलेन मशीनच्या सहाय्याने ट्रॅक्टरने स्टॉक तयार करत रेतीचा अवैध उपसा केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार सुरू आहे. स्थानिक प्रशासनाच्या नाकावर टीच्चून रेती तस्करी केल्या जात आहे.जिल्हा प्रशासनाने रेती घाटावर उरलेला स्टॉक उचलण्याची(३१) डिसेंबर पर्यंत परवानगी दिली होती.मात्र अनेक घाटावर स्टॉक शिल्लक न्हवता मिळालेल्या परवानगीच्या आधारावर संधीचा फायदा घेत स्टॉक व्यतिरिक्त पुन्हा नदीपत्रातून रेती उपसा करने सुरू आहे. मोठ्या प्रमाणात रेती तस्करांकडून दादागिरी करत रेती उपसा सुरू आहे.नदीपात्रात जेसीबी, हायवा,पोकलेनचा वापर करू नये यासाठी सरपंच, तमुस अध्यक्ष यांच्यासह काही महिलांनी रेती घाटावर धडक दिली.शाब्दिक वादानंतर मारहाणीत रूपांतर झाले.रेती तस्करांनी लोखंडी रॉड व धार शस्त्रांनी जीवघेणा हल्ला केला. हलेखोरांची ओळख पटली असून हल्लेखोरांनी घटनास्थळवरून पळ काढला.जीव घेणा हल्ला,बेकायदेशीर जमाव जमवल्याप्रकरणी जखमींच्या बयानुसर ओडख पटल्यावर तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला.साहिल सय्यद,वैभव पेचे रा.चंद्रपूर यांना पोलिसांनी ताब्यात घेतले एक आरोपी फरार असून पुढील तपास ठाणेदार जीवन राजगुरू,पीएसआय मोगरे यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे.गंभीर जखमी असल्याने तरुण उमरे,तमुस अध्यक्ष चंद्रशेखर लखमापुरे यांना चंद्रपुर जिल्हा ग्रामीण रुग्नालयात रेफर करन्यात आले आहे. शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल पाण्यात बुडत आहे . कुलथा परिसर रेती तस्करीच्या बाबतीत नेहमीच चर्चेत असतो.रेती उत्तम दर्जाची असल्याने येथील रेतीला मार्केट मधे मोठी मागणी आहे. मागील काही दिवसांमध्ये परिसराला रेती तस्करांचे 'माहेरघर' म्हणून पाहिले जात आहे.जिल्ह्यातील अनेक मोठे व्यावसायिक,राजकीय नेते या तस्करीत उतरले असून यांना आळा कोण घालणार ..? असा प्रश्न निर्माण झाला आहे. घाटालगत गावे असल्याने नागरिकांची झोपमोड होत असून मनस्ताप सहन करावा लागत आहे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.या गंभीर प्रकाराकडे महसूल यंत्रणेचे दुर्लक्ष होत आहे.

# पीएम आवास योजना बारगळली:एक लाख बेघरांना हक्काच्या घरांची प्रतीक्षा

**धाराशिव**–सर्वसामान्य संवर्गातील गरिब नागरिकांना हक्काचे घर मिळण्यासाठी सुरू करण्यात आलेली पंतप्रधान आवास योजना बारगळ्यात जमा आहे. अद्यापही १ लाख ३ हजार लाभार्थी योजनेतून घरकुल मिळण्याच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र, दोन वर्षांपासून योजनेसाठी लाक्षांकच मिळाला नसल्यामुळे त्यांच्या हक्काच्या घराचे स्वप्न अपूर्णच राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. लाक्षांकच नसल्यामुळे प्रशासनही यासंदर्भात हात वर करत आहे.शासनाने मागासवर्गिय कुटुंबांसाठी मोठ्याप्रमाणात घरकुलांच्या योजना सुरू केल्या आहेत. मात्र, मागास वर्गातील गरिब कुटुंबांसाठी घरकुल योजना उपलब्ध नव्हती. यामुळे पंतप्रधान आवास योजना सुरू झाल्यानंतर अशा कुटुंबातील नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होईल असे वाटत होते. मात्र, सध्या त्यांचे घराचे स्वप्न हे स्वप्नच राहणार असल्याचे दिसत आहे. चार वर्षांपूर्वी या योजनेसाठी जिल्ह्यातील १ लाख २९ हजार लाभार्थींची निवड सर्वेक्षण करण्यासाठी पंचायत समितीच्या माध्यमातून पथके निवडण्यात आली. मात्र, पथकांनी चार वर्षांपूर्वी लवकरच सर्वेक्षण करण्यासाठी तसदीच घेतली नाही. नंतर सर्वेक्षणात प्राप्त झालेल्या लाभार्थींच्या निवडीला ग्रामसभांच्या माध्यमातून मान्यता मिळणे आवश्यक होते. परंतु, हा विषय ग्रामसभेत घेण्यासाठी ग्रामपंचायतींनीही मोठा विलंब लावला. आता उद्दिष्टच मिळत नसल्यामुळे योजनेला आणखी विलंब लागत आहे. ओबीसी समाजासाठी शासनाने मागेच वेगळी योजना घोषित केली होती. सुरूवातीला याच लाभार्थींपैकी ओबीसी वेगळे करून त्यांना घरकुल देण्यात येत असल्यामुळे योजनेला विलंब लागण्याचे सांगण्यात येत होते. मात्र, प्रत्यक्षात ओबीसी समाजासाठीचीही योजना अद्याप सुरू होऊ शकली नाही. या योजनेलाही ब्रेक लागला आहे. करण्यात आली होती. यामध्ये पक्के घर असलेले, घरात दुचाकी, चारचाकी वाहन असलेले तसेच अन्य कारणांमुळे २६ हजार २०० जणांची नावे वगळण्यात आली.उर्वरित १ लाख ३ हजार ८०० लाभार्थी अंतिम करण्यात आले होते. यांना खरोखरच घरांची गरज असल्याचे सर्वेक्षणातून समोर आले होते. यांना घरे मिळतील असे वाटत होते. मात्र, दोन वर्षांपासून उद्दिष्टच न आल्यामुळे त्यांचे स्वप्न अधूरे राहिले आहे. जिल्ह्याला २०२१ – २०२२ साठी ८१०२ घरकुल बांधण्यासाठी परवानगी देण्यात आली होती. म्हणजेच तितके उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यानंतर २०२२ – २०२३ व सध्याचे २०२३ – २०२४ वर्ष संपत येत आहे. तरीही अद्याप या दोन्ही वर्षांची उद्दिष्ट प्राप्त झालेली नाहीत.

# डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या प्रयत्नाने सहा महिन्याच्या बाळाला जीवदान

**बीड । प्रतिनिधी**

अवघ्या ६ महिन्यांच्या बाळावर तातडीची शस्त्रक्रिया करणे आवश्यक असताना हॉस्पिटल प्रशासनाने थातुर मातुर कारणे देऊन सदर शस्त्रक्रिया ४ दिवसांपासून रखडून ठेवली होती. मात्र आयुष्मान भारत–मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या प्रयत्नाने सदर शस्त्रक्रिया तात्काळ व यशस्वीरित्या पार पडल्याने बाळास जीवदान मिळाले. त्यामुळे साहजिकच कुटुंबीयांच्या आनंदाला पारावर उरला नाही.

माजलगाव तालुक्यातील चिंचगव्हाण येथील चि.शिवांश वैभव शिंदे या अवघे ६ महिने वय असलेल्या बाळाच्या छातीस जन्मताच छिद्र होते. त्यासाठी तातडीने शस्त्रक्रिया करणे गरजेचे होते. स्थानिक डॉक्टरांनी तसा सल्ला नातेवाईकांना दिला होता. मात्र शस्त्रक्रियेसाठी खाजगी दवाखान्यात मोठा खर्च अपेक्षित होता. कुटुंबीयांची आर्थिक परिस्थिती सक्षम नसल्याने रूणाच्या आई–वडिलांनी कोणाच्या तरी सांगण्यावरून मुंबईतील दवाखाना गाठला.हॉस्पिटल प्रशासनाने काही तरी थातुर मातुर कारणे देऊन रुग्ण व कुटुंबीयांना ४ दिवस दवाखान्यात रखडत ठेवले. सर्व प्रयत्न करून थकल्यानंतर रुणाच्या नातेवाईकांनी शेवटी आयुष्मान भारत–मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे यांना संपर्क साधला. तसेच वरळी येथील कार्यालयात त्यांची प्रत्यक्ष भेट घेतली. डॉ. शेटे यांनी रुणाच्या नातेवाईकांची



आपुलकीने चौकशी करून एसआरसीसी हॉस्पिटलला दोन ओळींचे पत्र दिले. तसेच हॉस्पिटल प्रशासनास फोन करुन सदरील शास्त्रक्रिया तातडीने करण्याच्या सूचना दिल्या. चार दिवसापासून रखडलेला शस्त्रक्रियेचा प्रश्न चुटकी सरशी मार्गी लागल्याने बाळाच्या नातेवाईकांनी सुटकेचा श्वास सोडला. दुसऱ्या दिवशी सकाळीच बाळावर यशस्वीरित्या शस्त्रक्रिया पार पडली. चिमुकल्याच्या वडिलांनी फोन करून डॉ. ओमप्रकाश शेटे यांचे आभार मानले. मुंबई सारख्या धावत्या शहरात ग्रामीण भागातून आलेल्या गोरगरीब रुग्णांना डॉ. ओमप्रकाश शेटे यांचा मोठा आधार असल्याची प्रतिक्रिया रुग्णाच्या नातेवाईकांनी दिली. शेटे साहेबांनी केवळ उपचारासाठी मदतच नाही तर आमची आस्थेवाईकपणे विचारपूस करुन काळजी घेतल्याचेही शिंदे म्हणाले.



**आयुष्मान भारत–मिशन महाराष्ट्र समितीच्या 'जीवनदायी भवन' या नवीन कार्यालयात पहिल्याच दिवशी एका छोट्या बाळाच्या शस्त्रक्रियेचा प्रश्न सोडवून खऱ्या अर्थाने नवीन कामाचा श्रीगणेशा झाला. आगामी काळात लाखो रुग्णांना सुलभ आरोग्यसेवा देऊन 'जीवनदायी भवन' हे नाव सार्थकी लावू, त्यासाठी दिवसरात्र मेहनत घेण्याची आमची तयारी आहे.**

**– डॉ. ओमप्रकाश शेटे (प्रमूख– 'आयुष्मान भारत–मिशन महाराष्ट्र' समिती)**

## संपादकीय

# ‘ट्रिलियन डॉलर’चे गौडबंगाल

एका बाजूला प्रिमियम कारची विक्री वाढताना दिसते; तर साध्या कारच्या विक्रीत घट होते आहे. कुकीजची मागणी वाढत असताना साध्या बिस्किटांची विक्री मंदावताना दिसते आहे. चैनीच्या ब्रँडची चलती तर ‘एफ.एम.सी.जी.’ वस्तूंच्या विक्रीत गळती.

अशा प्रकारचे ‘जीडीपी’च्या वाढीचे स्वरूप आहे. प्रसंगी यातून मूल्यवृद्धी दिसते; पण वास्तव वाढीचा दर दिसत नाही. जेव्हा आर्थिक ‘वास्तव’ आणि राजकीय ‘अवास्तव’ या दोहोंमध्ये अधिकाधिक अंतर पडत जाते, तेव्हा आर्थिक परिस्थितीच्या आकलनातला गोंधळ वाढत जातो. अर्थव्यवस्था चार ट्रिलियन की पाच ट्रिलियन डॉलर ?सशक्त की अशक्त ? वेगाने वाढणारी तिसऱ्या क्रमांकाची वा चौथ्या क्रमांकाची ? सामान्यांच्या दृष्टीने सगळे प्रश्न गोंधळात भर घालणारे. त्यातही सकल देशांतर्गत उत्पन्न (जीडीपी) वाढीच्या दराच्या आधारेच अर्थव्यवस्था किती मोठी वा छोटी याचे विश्लेषण करायचे हेदेखील एकांगी आणि अतार्किक नव्हे काय ?वेगाने वाढत जाणारी अर्थव्यवस्था रोजगाराच्या अधिकाधिक संधी निर्माण करेल, उत्पन्न वाढवेल, त्यातून परकी गुंतवणूक वाढेल अशी लोकांची धारणा तयार करायची, ज्यातून सरकारवरचा विश्वास वाढेल, हा राजकीय अस्तित्वाचा आणि प्रगतीचा एक राजकीय अजेंडा असतो.सशक्त होत जाणाऱ्या आणि आकारमानाने वाढत जाणाऱ्या अर्थव्यवस्थेकडून दरडोई उत्पन्न आणि उपभोग, राहणीमानाची गुणवत्ता, बचत आणि गुंतवणूक, पायाभूत उद्योगांचा विकास, उत्पादकतेतील वाढ या व यासारख्या अन्य आर्थिक घटकांमध्ये अनुकूल भर पडते. अर्थव्यवस्था सशक्त होण्याचे हेही निकष अधिक सयुक्तिक असतात.जीडीपीच्या आकडेवारीसंदर्भात अनेक प्रश्न आहेत. किती तरी आधी झालेले सर्वेक्षण, जुना डेटा, उपभोगातला बदल डेटात प्रतिबिंबित न होणे, डेटा अभ्यासपद्धतीत वारंवार होत असलेले बदल, पायाभूत वर्षातली अनाकलनीयता यासारख्या खूप मर्यादा सांगता येतील.अर्थसंकल्पातल्या अंदाजानुसार २०२४ च्या आर्थिक वर्षात जीडीपीतील पैसारूपी वृद्धिदर (नॉमिनल) १०.५ टक्के असेल. हा अंदाज खरा असेल तर भारतीय अर्थव्यवस्था ३.७ ट्रिलियन डॉलर एवढी होते. या आर्थिक वर्षातील दुसऱ्या तिमाहीतील जीडीपीच्या वाढीचा अंदाज ७.६ टक्के वर्तविला आहे. रिझर्व्ह बँकेच्या ६.५ टक्के अंदाजाला या दराने मागे टाकले आहे.पैसाविषयक धोरणानुसार व्याजाचे दर वाढले तर वस्तू आणि सेवांची मागणी कमी होते. देशांतर्गत किंमती कमी होतात. भारतात ‘रेपो रेट’ वाढूनही आणि कर्जावरचा व्याजदर वाढूनही जीडीपीच्या वाढीच्या आकडेवारीत याचा परिणाम दिसून येत नाही.याचा अर्थ असा, की घरांना आणि वाहनांना असलेली मागणी व्याजदरावर अवलंबून न राहता लोकांची इच्छा आणि खरेदीखर्च या गोष्टींवर अवलंबून राहिली. याच तिमाहीत वास्तव व्याजदर ऋण राहिला. त्यानेही मागणीवर अनुकूल परिणाम साधला.किंमती वाढल्या आणि जीडीपीचा अंदाज वाढला. त्याचप्रमाणे ७.६ टक्के वृद्धीदर औद्योगिक उत्पादन वाढीच्या १३.९ टक्के दराच्या वाढीमुळेही दिसतो. आश्चर्यकारक निरीक्षण म्हणजे कॉर्पोरेट क्षेत्रातील उलाढाल ऋण असूनदेखील नफा वाढला, याचे कारण निविष्टिचा (इनपुट) खर्च कमी झाला.त्यामुळे उद्योग क्षेत्रातील जीडीपीच्या वाढीतलं योगदान उत्पादनवाढीपेक्षा नफ्यातल्या वाढीमुळे आहे. ‘बँक ऑफ बडोदा’च्या एका अभ्यासानुसार दुसऱ्या तिमाहीत २७४९ कंपन्याच्या विक्रीत ०.५ टक्के घट झाल्याचे दिसते.मागणीत झालेल्या घटीमुळे ही घट असेल तर या कंपन्यांच्या भविष्यकाळातील गुंतवणुकीविषयी काय, हा प्रश्न पडतो. उद्योगक्षेत्राबरोबरच व्यापार, वाहतूक, हॉटेल व्यवसाय यातील वास्तव वृद्धिदर केवळ ४.३ टक्के दिसून येतो. याच तिमाहीत उपभोगावर आधारित जी.एस.टी. करसंकलन वाढलं.मात्र करसंकलन वाढीचा दर उपभोगातल्या वाढीच्या दरापेक्षा अधिक होता, त्यामुळे एकूण उपभोगाच्या बाबतीत या तिमाहीत नेमके काय घडतेय, हे लक्षात येत नाही. बँक कर्जातील वाढ, खासगी क्षेत्रातील अंतिम उपभोग खर्चासंबंधीची ‘जीडीपी’ची आकडेवारी आणि ‘जीएसटी’ करसंकलनाची आकडेवारी या गोष्टी एकमेकांशी जुळणाऱ्या नाहीत.करसंकलनातील वाढ ही कराची वाढलेली व्याप्ती आणि किंमतीतील वाढ या गोष्टींमुळे असेल हा अंदाज आहे. उपभोगातल्या वाढीमुळे ती आहे की नाही हे सांगणे कठीण आहे. याच तिमाहीत चालू किंमतींना सकल देशांतर्गत भांडवल वृद्धीचा दर ३० टक्क्यांपर्यंत वाढलेला दिसतो.यातील पैसारूपी वाढ आहे १२.५ टक्के आणि वास्तव वाढ आहे ९.९ टक्के. याच काळात औद्योगिक क्षेत्राला झालेल्या वित्तपुरवठ्याचा दर आहे ६.५टक्के. म्हणजेच भांडवलगुंतवणुकीत चांगली वाढ होऊनही उद्योगक्षेत्रातील वाढ सर्वव्यापक दिसून येत नाही.भारतीय अर्थव्यवस्था जलद गतीने वाढणारी असेल तर अधिकाधिक रोजगाराच्या संधी निर्माण व्हायला पाहिजेत. पण तसे दिसत नाही. ‘सेंटर फॉर मॉनिटरिंग इकॉनॉमी’च्या अहवालानुसार, जुलैमध्ये हा दर ७.९५ टक्के होता.ग्रामीण भागात हा दर ऑक्टोबरमध्ये १०.०९ टक्क्यांपर्यंत वाढला. युवकांच्या रोजगारसंधीची गरज भागवायची असेल तर आर्थिक प्रगतीचा वार्षिक सरासरी दर आठ टक्क्यांपेक्षा अधिक असायला हवा, असे डॉ. रघुराम राजन यांना वाटते.‘पिरीऑडिक लेबर फोर्स’च्या पाहणी अभ्यासानुसार, जुलै २२ ते जून २३ या कालावधीत स्वयंरोजगाराची आणि बिगरपगारी श्रमिकांची संख्या लक्षणीय होती. असेही लक्षात आले की, गेल्या सहा वर्षांच्या तुलनेत बेरोजगारीचा दर ३.२ टक्के इतक्या निम्नस्तर पातळीवर आला असेल (निम्नस्तर पातळी असेल तर) तर वाढणाऱ्या रोजगारदरात वेतन न मिळणाऱ्या श्रमिकांचा हिस्सा अधिक आहे.म्हणजेच वाढणारी रोजगाराची आकडेवारी ही विनावेतन काम करणाऱ्या श्रमिकांच्या वाढीव आकडेवारीमुळे आहे. ज्या ‘जीडीपी’च्या वाढणाऱ्या दराविषयी ‘ट्रिलियन डॉलर’ची चर्चा चालू आहे, त्यासंदर्भात एक निरीक्षण महत्त्वाचं आहे.एका बाजूला प्रिमियम कारची विक्री वाढताना दिसते; तर साध्या कारच्या विक्रीत घट होते आहे. कुकीजची मागणी वाढत असताना साध्या बिस्किटांची विक्री मंदावताना दिसते आहे. चैनीच्या ब्रँडची चलती तर ‘एफ.एम.सी.जी.’ वस्तूंच्या विक्रीत गळती.अशा प्रकारचे ‘जीडीपी’च्या वाढीचं स्वरूप आहे. प्रसंगी यातून मूल्यवृद्धी दिसते; पण वास्तव वाढीचा दर दिसत नाही. या आर्थिक प्रगतीला इंग्रजी भाषेतील ‘के’ आकाराची किंवा असमतोल आर्थिक प्रगती असे म्हणता येईल.म्हणजे वरच्या उत्पन्न गटात वाढत चाललेली श्रीमंती आणि खालच्या अल्प आणि अतिअल्प उत्पन्न गटात वाढणारी गरीबीची स्थिती. याला राजन ‘प्रिमियमिझम’ असं संबोधतात. या आर्थिक वर्षातील पहिल्या सहा महिन्यांतील आर्थिक प्रगतीला सरकारची पायाभूत क्षेत्रातील गुंतवणूक आणि जागतिक अर्थव्यवस्थांच्या वृद्धी दरात झालेली वाढ ही दोन कारणे आहेत.‘जीडीपी’च्या वाढीचा दर जरी चांगला असला तरी खासगी उपभोगखर्च आणि खासगी गुंतवणुकीत अपेक्षेइतकी वाढ झालेली नाही. राजन यांच्या मते कोविडपूर्व काळापासून ते आजतागायत अशा चार वर्षांच्या काळात अर्थव्यवस्थेची प्रगती प्रतिवर्षी चार टक्क्यांनी झाली. जी सहा टक्के या आपल्या संभाव्य वाढीच्या दरापेक्षा खूप कमी दिसून येते.कोविडपूर्व काळच्या जी.डी.पी. वृद्धी दराच्या तुलनेत भारत पाच टक्क्यांनी कमी आहे. अधिकाधिक रोजगार निर्माण करायचा असेल तर ‘जीडीपी’च्या आत्ताच्या वृद्धिदरात झपाट्याने वाढ व्हायला हवी.सद्यःस्थितीत भारताची अर्थव्यवस्था ३.७ ट्रिलियन डॉलर मूल्याची आहे. याउलट जपान आणि जर्मनीच्या अर्थव्यवस्था अनुक्रमे ४.४ व ४.३ ट्रिलियन डॉलर मूल्यांच्या आहेत. जर भारताची अर्थव्यवस्था पुढील दोन वर्षात पाच ट्रिलियन मूल्याची व्हायची असेल, तर वास्तव आर्थिक विकासाचा दर हा सरासरी १२ ते १५ टक्के हवा.त्यामुळे सद्यःस्थितीत असलेला ६ ते ६.५ टक्के दर हा पुरेसा नाही. माँटेकसिंग अहलुवालियांच्या मते, दरवर्षी सातत्याने दहा वर्षासाठी आर्थिक प्रगतीचा दर ७.५ टक्के असायला हवा. जर १२ ते १५ टक्क्यांपर्यंत जायचे असेल तर सरकारकडे कोणती प्रभावी योजना अथवा परिणामकारक आर्थिक कार्यक्रम आहे, हे स्पष्ट व्हायला हवे.सरकारने आर्थिक सुधारणांची सुरवात केलीच आहे. या पुढे देशांतर्गत उपभोग गुंतवणूक आणि निर्यातीचा ठोस कार्यक्रम याबरोबरच परदेशी गुंतवणूक वाढण्यासाठी पायाभूत सेवांचे भक्कम जाळे विणले पाहिजे. तसे झाले तर ट्रिलियन डॉलरचे गौडबंगाल आकलनीय होईल.

# ऊर्जा संक्रमणासाठी हवे योग्य धोरण

ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ व लोकनेते, जीवाश्म इंधनापासून अक्षय्यतेकडे वेगाने बदल घडवून आणण्याच्या प्रयत्नात आहेत. तसे करणे अर्थातच आवश्यकही आहे; परंतु हे संक्रमण करताना दृष्टिकोन विचारपूर्वक आणि सर्वसमावेशक हवा.‘टूबी ऑर नॉट टू बी’ या शेक्सपिअरियन विधानासारखी काहीशी गत जीवाश्म इंधनाची झाली आहे. ऊर्जा संक्रमण, हवामान बदलाच्या या काळात, ऊर्जा उद्योग व या क्षेत्राशी निगडित विविध घटक गेल्या काही वर्षांत परिवर्तनशील स्थितीत आहेत. जीवाश्म इंधनाची नियोजित समाप्ती हा जागतिक पातळीवर विवादाचा व गंभीर विश्लेषणाचा विषय बनला आहे.नुकतीच दुबईत पार पडलेली उजझ २८ ची परिषद काय, ऊसापासून इथेनॉल उत्पादनावर तात्पुरती बंदी घालण्याचा महाराष्ट्र सरकारचा निर्णय काय किंवा रण ऑफ कच्छ सौर आणि पवन प्रकल्प काय, एकूणच ऊर्जेचा प्रश्न प्रकाशझोतात आला आहे.जीवाश्म इंधन हा आजच्या आधुनिक, औद्योगिक युगासाठी ऊर्जेचा एक प्रमुख स्त्रोत आहे. तो मानवी जीवनाचा, जागतिक अर्थव्यवस्थेचा एक अविभाज्य भाग आहे. जीवाश्म इंधनावर आधारित जीवनशैलीत बदल घडवून आणणे हे सोपे नाही. परिणामतः हे संक्रमण सोपे असणार नाही. जीवाश्म इंधन – वापराद्वारे होणाऱ्या कार्बन उत्सर्जनामुळे होणारे हरितगृह परिणाम आणि हवामान बदल ही वैज्ञानिक वस्तुस्थिती जरी असली तरी, तपशीलात काही मतभेद आहेत.जीवाश्म इंधने ही हवामानबदलाचे दोषी नसून हवामानबदल हा सृष्टीतील एक नैसर्गिक बदल आहे, असे वादाकरिता गृहीत धरले तरीही आपल्या जीवनशैलीत पर्यायी ऊर्जास्त्रोतांचा समावेश करणे आवश्यक आहे. याचे कारण जीवाश्म इंधने तांत्रिकदृष्ट्या पुनर्नवीकरणाची क्षमता राखत नाहीत. म्हणजेच जीवाश्म इंधनाची उपलब्धी सीमित आहे.कार्बन डायऑक्साईड, मिथेन, व इतर हरितगृह वायूंचे पृथ्वीभोवती आवरण निर्माण झाले आहे, ज्यामुळे जागतिक तापमान वाढून आजची हवामानबदलाची स्थिती निर्माण झाली आहे. निव्वळ शून्य राखण्यासाठी किंवा १.५ अंशांच्या सुरक्षित मर्यादेत जागतिक तापमानवाढ स्थिर ठेवण्यासाठी हे कार्बन डायऑक्साईड व इतर हरितगृह आवरण काढून टाकणे अथवा कमी करणे आवश्यक आहे.१९८१मध्ये शास्त्रज्ञांनी ग्लोबल वॉर्मिंगची नोंद घेण्यास सुरुवात केल्यापासून डीकार्बनायझेशनच्या (वातावरणातून कार्बनचे प्रमाण कमी करणे) विविध पद्धती व उपक्रम राबवले गेले आहेत. सुरुवातीस त्यात जंगलतोड कमी करणे, वनीकरण, काही प्रमाणात सौर ऊर्जा व पवन ऊर्जेचा विकास व वापर, इत्यादीसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. तरीही अक्षय ऊर्जेच्या स्त्रोतांचा विकास आणि व्यापक वापर ही डेकार्बनायझेशनच्या उद्दिष्टाच्या दिशेने काम करण्याची सर्वात वास्तविक पद्धत आहे.गेल्या शतकाच्या अंती, सौर व पवन ऊर्जेचा विकास केला गेला. विविध पद्धतीद्वारे डीकार्बनायझेशन वाढवणे, ऊर्जाप्रणालीत अक्षय ऊर्जास्त्रोतांचा समावेश वाढवणे व त्याचबरोबर जीवाश्म इंधनाचा वापर कमी करणे हा ऊर्जा संक्रमणासाठी योग्य रोड मॅप ठरवला गेला आहे. हे उद्दिष्ट समोर ठेऊन आज जगातील ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ व लोकनेते, जीवाश्म इंधनापासून अक्षय्यतेकडे वेगाने बदल घडवून आणण्याच्या प्रयत्नात आहेत,.हे आवश्यक आहे; परंतु या बदलाबाबत दृष्टिकोन विचारपूर्वक आणि सर्वसमावेशक हवा. ऊर्जा प्रणालीतील बदल, ऊर्जा संक्रमण हे जबाबदारीने होणे आवश्यक आहे. कोणतीही ऊर्जाप्रणाली ही समाजमान्य होण्यासाठी ती मुळात सामान्य माणसास सहज, सुलभरीत्या उपलब्ध असणारी व परवडणारी असणे गरजेचे असते.गेल्या १०० वर्षांत जागतिक स्तरावर ऊर्जेचे प्राथमिक स्त्रोत म्हणून जीवाश्म इंधनाची प्रगती, त्याचे आज वातावरणावर होणारे परिणाम याचा तज्ज्ञ, धोरणकर्ते यांनी काळजीपूर्वक अभ्यास करून निर्णय घ्यायला हवेत. सध्या जरी नूतनीकरणक्षम



ऊर्जा स्त्रोतांचा एकूण ऊर्जावापरात केवळ २० टक्केच समावेश असला तरी, हवामान कृती अंतर्गत, पुढील दशकांमध्ये ऊर्जावापरात अक्षय ऊर्जा स्त्रोतांची उपस्थिती अनेक पटींनी वाढवावी लागेल. त्यासाठी ऊर्जासंबंधित सामाजिक–आर्थिक धोरण बदलावे लागेल.जेव्हा जीवाश्म इंधने प्रथम वापरात आली, तेव्हा ती तात्काळ लोकप्रिय होणे, यामागे कारणे विविध होती. स्वस्त, सुलभ उपलब्धता ही कारणे महत्त्वाची. औद्योगीकरण, कृषी क्षेत्र, वाहतूकप्रणाली हे कोणत्याही देशाची प्रगती व अर्थकारण चालवणारे घटक जीवाश्म इंधनावर धावू लागले. मात्र या वाटेवर कुठेतरी, जागतिक पातळीवर ऊर्जेचा प्राथमिक स्त्रोत म्हणून जीवाश्म इंधनाचा घाईघाईने अविवेकीपणे वापर केला गेला.भांडवलशाही दृष्टिकोन आणि विकासाचे स्वीकारलेले प्रारूप यामुळे जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदल वेगाने वाढत गेले. तीच चूक पुनः होणे, हे अविवेकी ठरेल व आजचे ऊर्जा संक्रमणासाठीचे प्रयास भविष्यात फलस्वरूपी निरर्थक ठरू शकतील. त्यामुळेच आज येथे एक सावध विराम आवश्यक आहे.आज पुन्हा ऊर्जाप्रणालीबाबत विचार करायला हवा. सौरऊर्जा, पवनऊर्जा आणि यासारख्या अक्षय्य ऊर्जास्त्रोतांच्या दिशेने वाटचाल करीत आहोत. जीवाश्म इंधन कधीतरी संपुष्टात येणारच, ज्यामुळे पर्यायांची गरज आहे. जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदल ही वस्तुस्थिती असल्याने वातावरण प्रदूषित न करणाऱ्या ऊर्जास्त्रोतांची गरज आहे. पण ऊर्जा संक्रमणाचा दृष्टिकोन खऱ्या अर्थाने सामाजिक, लोकतांत्रिक असला पाहिजे.भविष्यात उभ्या राहणाऱ्या विस्तीर्ण सोलर फार्म्स व पार्क्स, विंड फार्म्स इत्यादींच्या संभाव्य दुष्परिणामांचा अंदाज लावू शकतील अशा वैज्ञानिक व त्याचबरोबर सामाजिक – आर्थिक प्रारूपांचा तपशीलवार अभ्यास करणे आवश्यक आहे. कर्नाटकातील सौर ऊर्जा प्रकल्पांच्या सामाजिक– आर्थिक दुष्परिणामांचे अहवाल दुर्लक्षिता येणार नाहीत.विविध अक्षय ऊर्जाप्रणालीचा मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सरकार जी आर्थिक गुंतवणूक करते, ती अत्यंत मोठी असते. या गुंतवणुकीत देशाच्या करदात्यांच्या पैशांचाही समावेश आहे. त्यामुळे मोठ मोठ्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यापूर्वी, एक पाऊल मागे सरून, भविष्यातील चांगल्या व वाईट दोन्ही परिणामांचा खोलवर अभ्यास असावा.त्यामुळे सरकार, धोरणकर्ते, उद्योग नेत्यांनी नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील सखोल संशोधन आणि विकासाच्या प्रश्नाकडे लक्ष देणे आवश्यक आहे आणि केवळ सौर, हायड्रोजन, पवन इत्यादी ऊर्जास्त्रोतांच्या सध्या उपलब्ध साधनांवरच फक्त लक्ष केंद्रित न करता, इतर नवीन कल्पना, पर्यायदेखील विकसित करण्यासाठी वैज्ञानिक प्रयत्न हवेत.भविष्यात अक्षय्य ऊर्जास्त्रोतांच्या व्यापक वापराचा नकारात्मक परिणामाचा अभ्यास केवळ पर्यावरणापुरता मर्यादित न ठेवता, वाढत्या लोकसंख्येशी थेट निगडित असलेले अन्न, निवारा, यासारख्या मानवी जीवनातील इतर महत्त्वाच्या घटकांचाही विचार झाला पाहिजे. प्रत्येक देशात समान गतीने ऊर्जा संक्रमण घडवून आणण्याची सक्ती चुकीची ठरेल. आर्थिकदृष्ट्या कमकुवत राष्ट्रे ऊर्जा संक्रमणाची गतिमान जबाबदारी पेलू शकतीलच, असे नाही.अशा राष्ट्रांना धनाढ्य विकसित राष्ट्रांनी आर्थिक सहाय्य पुरविणे हे केवळ चर्चा व कागदोपत्री असणे ठीक नाही. हवामान बदल हा जगाच्या हिताचा प्रश्न आहे. तथापि ऊर्जा संक्रमणाची जबाबदारी पार पाडण्यास हरेक राष्ट्राने आपापली भूमिका ओळखून हा संक्रमणाचा मार्ग सर्वांसाठी सुलभ केला पाहिजे.१.५ अंश तापमानाचे लक्ष्य साध्य करण्याच्या उद्दिष्टाच्या दिशेने विकास जाणीवपूर्वक व सातत्यपूर्ण असावा.अन्यथा शाश्वत व न्याय्यपूर्ण अशा पर्यावरणीय आणि आरोग्यदृष्ट्या सुरक्षित ऊर्जा मॉडेल अंतर्गत १.५ अंश लक्ष्य गाठणे अशक्य होईल. ऊर्जा संक्रमणाचे युग, हे जीवाश्म इंधनाच्या युगाप्रमाणेच तात्पुरते ठरेल. या संक्रमणातून मानवतेला योग्य मार्गदर्शन करण्याची जबाबदारी जागतिक लोकनेते, ऊर्जातज्ज्ञ तसेच धोरणकर्त्यांनी विवेकाने निभावली पाहिजे.

# रसेल यांच्या नजरेतून चीन

भारताचा चीनशी प्राचीन काळापासून साहित्य, संगीत, भाषा, धर्म आणि तत्त्वज्ञान या संदर्भात मूलतः ‘सांस्कृतिक आणि तात्त्विक अनुबंध’ आहे. तो आणखी दोन प्रकारचा आहे. पहिला प्राचीन ‘वांशिक अनुबंध’ आणि दुसरा आधुनिक व्यापारी व भू–राजकीय अनुबंध.तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते, भारतीय समाज ऑस्ट्रिक, द्रविड आणि वैदिक आर्य या तीन वंशांनी मिळून बनला आहेच; पण त्याखेरीज इंडो–युरोपीयन व चिनी–तिबेटी वंशाचे मिश्रणही आजच्या भारतीय समाजात आढळते.भाषिक व वैवाहिक नात्यांनी हा समाज बनला होता. दुसरीकडे आधुनिक व्यापारी संबंध आणि भू–राजकीय अनुबंधही दोघांत आहेत. अशा प्रकारे भारत–चीन–तिबेट नाते हा नव्या शोधाचा विषय बनतो.चीन आणि जगाच्या तात्त्विक व राजकीय नात्याचे स्वरूप सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ता बर्ट्रांड रसेलने शंभर वर्षांपूर्वी, १९२२च्या दरम्यान आपल्या ‘दि प्रॉब्लेम ऑफ चायना’ या पुस्तकात स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.चीनमधील विवेकवाद्यांनी आणि शांघाय पत्रकार संघाने १९२०दरम्यान रसेल यांना व्याख्याने देण्यासाठी निमंत्रण दिले होते. चीनमध्ये दहा महिने राहून त्यांनी तेथे विविध विषयांवर व्याख्याने दिली. हे पुस्तक त्या व्याख्यानांवर आधारलेले आहे.त्यात रसेल चीनच्या तत्त्वज्ञानात्मक व बौद्धिक इतिहासाची चर्चा करतात. त्या इतिहासानेच चीनच्या आर्थिक व विज्ञान–तंत्रज्ञान विकासाला कसे वळण दिले, ते स्पष्ट करतात. चीनच्या सांस्कृतिक विकासाचा आधार कन्फ्युशियसचे राष्ट्रवादी तत्त्वज्ञान, लाओत्सेचा ताओवाद आणि चिनी बुद्धवाद हा आहे.परिणामी अनेक शतके चिनी प्रशासन, राजकारणावर विचारवंत, साहित्यिक आणि बुद्धिजीवी यांचा प्रभाव आहे, हे रसेल अधोरेखित करतात.या पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणात ते लिहितात, की आपली नैसर्गिक साधनसंपत्ती, लोकसंख्या आणि उच्च राष्ट्रभक्तीची भावना यांच्या बळावर चीन एक दिवस अमेरिकेपेक्षा अधिक शक्तिशाली महासत्ता



बनेल.त्याचवेळेस तो सावधगिरीचा इशारा देतो की, राष्ट्रभक्ती संरक्षणासाठी पुरेशी बलशाली झाली असे सिद्ध झाले की इतर राष्ट्रांवर आक्रमण करू पाहते. आपल्याच नागरिकांवर अत्याचार करू लागते. त्यामुळे त्या देशाचीच नव्हे तर सबंध जागतिक शांतता धोक्यात येते.हा अतिरेकी राष्ट्रभक्तीचा धोका असतो. रसेल लिहितात, आधुनिक समजला जाणारा पाश्चात्य माणूस जगात स्वार्थी बदल घडवून ‘विकास’ करू पाहतो, तर ‘सर्वसाधारण चिनी माणूस’ (किंवा कोणत्याही देशाचा सामान्य नागरिक) आपली संस्कृती जपत जास्तीत जास्त नजाकतीने सभ्य व आनंदी राहण्याचा प्रयत्न करतो.पाश्चात्य लोकांना विकास म्हणजे केवळ भौतिक विकास वाटतो; विकास म्हणजे भौतिक विकासासह मानसिक विकास साधणे. प्रजेने आनंदी असणे हे त्याचे प्रमुख लक्षण. विद्यमान चिनी राज्यकर्तेच काय, जगातील सारेच राज्यकर्ते हे तत्त्व विसरून जाताहेत, असे आढळते.आज आपण पाहतो की, चीनने कन्फ्युशियसचे ‘अपत्याचे राष्ट्रार्पण’ (षळश्रळरश्र ळिशींू) म्हणजे प्रत्येक कुटुंबाने आपल्या कुटुंबानंतर राष्ट्र हेच कुटुंब मानून आपले किमान एकतरी अपत्य राष्ट्रसेवेसाठी अर्पण करावे, या धोरणाचे काटेकोर पुनरुज्जीवन केले.त्याच वेळेस राज्यकर्त्यांनी कन्फ्युशियसची ‘तत्त्ववेत्ता राजा’ आणि ‘आदर्श राजधर्म’ या संकल्पनांची मोडतोड केली. रसेल म्हणतात, चीन जो काही विकास करेल त्यामुळे सारे जग मुळापासून खोलवर प्रभावित होईल.पुढील दोन शतके जगात जे काही चांगले–वाईट घडत राहील, त्या समग्र घटनांमागील निर्णायक घटक म्हणून सिद्ध होईल. त्याचे हे भाकीत सत्य ठरू पाहत आहे, हे कोरोनाने सिद्ध केले आहे.

– श्रीनिवास हेमाडे

# लायन्स एक्स्पो च्या माध्यमातून लघु आणि घरगुती उद्योगाला चालना मिळेल - आ.किशोर जोरगेवार

## आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते लायन्स एक्स्पोचे उद्घाटन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

स्पर्धेच्या युगात सरकारी नौकरी मिळविणे कठीण झाले आहे. अशात स्वयंरोजगाराकडे आपण वळले पाहिजे. अनेक बचत गटांनी लघु उद्योग सुरु केले आहे. लायन्स एक्स्पो मध्ये या बचट गटांना स्टॉलउपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्यामुळे लायन्स एक्स्पोच्या माध्यमातून लघू आणि घरगुती उद्योगांना चालना मिळणार असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. लायन्स क्लबच्या वतीने चांदा क्लब मैदान येथे पाच दिवसीय एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते एक्स्पोचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला लायन्स क्लब चे प्रांतपाल बालबीर सिंह वीज,डॉ विलास मुळे,शैलेश बागला,घनश्याम दरबार,दिनेश बजाज,राजू भास्करवार,बबलू कोठारी,माता महाकाली महोत्सव समितीचे सचिव अजय जयस्वाल,माजी नगर सेवक बलराम डोडाणी,पंकज शर्माआदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.यावेळी पूढे बोलताना आ. जोरगेवार







म्हणाले कि,लायन्स क्लबच्या वतीने एक्स्पोचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. यात आपण विद्यार्थांमधील कलागुणांना वाव मिळावी यासाठी मंच उपलब्ध करुन देण्याचे काम केले आहे. बचत गटांनी तयार केलेल्या वस्तु विक्रिसाठीही आपण त्यांना स्टॉल दिले आहे. यातून नक्कीच या छोट्या उद्योगांना फायदा होणार आहे. असे आयोजन हे नियमित झाले पाहिजे. आपल्या घरगुती आणि बचत गटांतील महिलांच्या उद्योग वाढीसाठी हे आयोजन वरदान ठरणार असल्याचेही ते या प्रसंगी बोलताना म्हणाले.लायन्स एक्स्पो च्या शुभारंभ प्रसंगी हस्ताक्षर स्पर्धा,फॅन्सी ड्रेस,समूह नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. माता महाकाली च्या पूजनाने सदर एक्स्पो चा शुभारंभ करण्यात आला. सदर आयोजन ३१ डिसेंबर पर्यंत चालणार असून एक्स्पो मध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या कला गुणांना मंच मिळावा या उद्देशाने विभिन्न स्पर्धा चे आयोजन करण्यात आले आहे. एक्स्पो च्या यशस्वीतेसाठी शैलेश दरबार, अजय वैरागडे ,विश्वास माधमशेट्टीवार,गोपिकीशन,डॉ अपर्णा सोनवलकर,अनु बागला,अंजु गोयल,पूजा जैन, सुनीता जैन,कविता अग्रवाल,जया सातपुते,लक्ष्मी अग्रवाल,मंजू गोयल,कविता तहीलीयनी,अभिषेक बांगला,निर्मल भंडारी,पंकज खजांची,कोमल मुरारका,सोनल पुगलिया,सोनिया गुप्ता परिश्रम घेत आहे.

## मी १० वर्षांपासून लोकसभा लढण्यास इच्छूक:अंबादास दानवे उघडपणे बोलले

## त्यांच्यामुळेच माझा पराभव झाला-चंद्रकांत खैरेंचा पलटवार





**छत्रपती संभाजीनगर**-आगामी लोकसभा निवडणुकांसाठी सर्वच पक्षा कामाला लागले आहेत. अशातच, लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनीही आपल्या इच्छा जाहीरपणे व्यक्त करण्यास सुरुवात केली आहे.शिवसेना आणि राष्ट्रवादीत पडलेल्या अंतर्गत फुटीमुळे आगामी लोकसभा निवडणूक चुरशीची ठरणार आहे. अशातच छत्रपती संभाजीनगर लोकसभेच्या जागेवरून ठाकरे गटाच्या नेत्यात जुपल्यांचे पाहायला मिळत आहे. ठाकरे गटाचे नेते, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे दोघेही येणाऱ्या लोकसभेच्या रिंगणात उतरण्यासाठी इच्छूक आहे. दोन्ही नेते छत्रपती संभाजीनगरमधून लोकसभेची निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत, तशी जाहीरपणे त्यांनी माध्यमांशी बोलतांना इच्छा देखील बोलून दाखवली.विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे माध्यमांशी बोलताना म्हणाले की, मी शिवसैनिक आहे, पक्षप्रमुख जो आदेश देतील, तो मान्य असेल. पक्षप्रमुखांनी सांगितलं लढायचं, तर लढायचं, पक्षप्रमुखांनी सांगितलं नाही लढायचं, तर नाही लढायचं. तसेच, पक्षप्रमुखांनी सांगितलं की, संघटनेचं काम करायचं, तर करायचं. हा आदेश मानणारा मी शिवसैनिक आहे. त्यामुळे आदेश मानणारा मी शिवसैनिक आहे.दानवे म्हणाले की, मी शिवसैनिक आहे. पक्षप्रमुख जिथे सांगतील तिथे लढण्याची माझी तयारी आहे. कुठेही लढायला सांगितलं तरी, केवळ निवडणूक नाही, इतर कोणतीही लढाई लढायला सांगितली तरी ती लढाई लढण्याची माझी १०० टक्के तयारी आहे., असं अंबादास दानवे म्हणाले. जर तुम्हाला संभाजीनगरातून निवडणूक लढवायला सांगितली, तर लढवणार का? या प्रश्नावर बोलताना दानवे म्हणाले की, मी मागच्या १० वर्षांपासून निवडणूक लढण्यास इच्छुक आहे.अंबादास दानवेंना निवडणूक लढवण्याची इच्छा होती. त्यामुळे गेल्या निवडणुकीत माझा पराभव झाला आहे. असा आरोप ठाकरे गटाचे नेते आणि माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी केला आहे. ते बोलताना म्हणाले की, इच्छा असली, तर माझी इच्छा मुख्यमंत्री व्हायची आहे. मग याचा अर्थ मी इतरांना पाडायचं आणि त्या पदावर जाऊन बसायचं का? असं नाही.त्यासाठी नशीबातही हवं. एकदा मी आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे भेटलो होतो. त्यावेळी ते म्हणाले की, अरे आपल्या नशीबातही हवं, नशीबात असेल तर मिळतं. आज तुला मला मंत्रिपद द्यायचं नाही, पण असं काही घडून आलं तर मला तुला मंत्रिपद द्यावं लागेल, असं बाळासाहेब म्हणाले होते. नशीबाची गोष्ट असते. .संभाजीनगरची जागा कोण लढवणार? असा प्रश्न चंद्रकांत खैरेंना विचारल्यावर चंद्रकांत खैरे म्हणाले की, छत्रपती संभाजीनगरची निवडणूक पक्षप्रमुख उद्धव ठाकरे सांगतील ते लढवणार. होईन ना चांगलं. कशाला काळजी करायची. जनतेची जी इच्छा आहे, ती उद्धव ठाकरे मान्य करतील, असेही खैरे माध्यमांशी बोलताना म्हणाले.

# इंडियन मेडिकल असोसिएशनचा 'कलादर्पण' राज्यस्तरीय सांस्कृतिक सोहळा उत्साहात साजरा

## सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांची माहिती



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्याच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध राज्यस्तरीय स्पर्धांचे पारितोषिक वितरण व गुणदर्शन कार्यक्रम नुकताच चिपळूण येथे संपन्न झाल्याची माहिती सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष तथा अंबाजोगाई येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी दिली.या कार्यक्रमास संघटनेचे प्रदेश अध्यक्ष डॉ.रवींद्र कुटे, इंडियन मेडिकल असोसिएशनचे चिपळूणचे अध्यक्ष डॉ.यतीन जाधव, आमदार शेखर निकम माजी आमदार रमेश भाई कदम, माजी आमदार सदानंदजी चव्हाण, डॉ.संघमित्रा फुले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अनिरूद्ध आठल्ये, जि.आ.अधिकारी प्रांत अधिकारी लिगाडे, डीवायएसपी राजमाने, चिपळूण कॉंग्रेस अध्यक्ष व वाशिष्टी मिल्क प्रॉडक्टचे संचालक प्रशांत यादव, तहसीलदार लोकरे, नगरपरिषदचे सीईओ शिंगटे, मुस्लिम समाजाचे कार्याध्यक्ष नाझीम भाई अफवारे. डॉ.संतोष कदम, सचिव आयएमए, डॉ.राजेश इंगोले अध्यक्ष, सांस्कृतिक समिती महाराष्ट्र राज्य, डॉ.अब्बासजी जबले, मेडिकल ऑफिसर उपजिल्हा रूग्णालय, डॉ.कांचनजी मदार, तालुका हेल्थ ऑफिसर ज्योतीजी यादव यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.रवींद्र कुटे, डॉ.राजेश इंगोले, डॉ.यतीन जाधव, डॉ.राम लोंढे, डॉ.कुलकर्णी, आमदार शेखर निकम यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्तविक करताना आयएमएचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी महाराष्ट्रातील डॉक्टर्ससाठी या सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. आपल्या दैनंदिन धकाधकीच्या जीवनात ताणतणाव विसरून इतक्या प्रचंड संख्येने डॉक्टर्स सहभागी झाले हेच या आयोजित कार्यक्रमाचे फलीत आणि यश असल्याचे सांगितले. कला ही माणसाच्या जगण्यात उतरली पाहिजे आणि जीवनातील ताणतणाव कमी करण्यासाठी प्रत्येकाने एखादी कला जोपासली पाहिजे असे मत व्यक्त केले. तर संघटनेचे अध्यक्ष डॉ.रवींद्र कुटे यांनी इंडीयन मेडीकल असोसिएशन सांस्कृतिक समिती तर्फे आयोजित या गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, छायाचित्र स्पर्धा, नृत्यस्पर्धा इतक्या मोठ्या प्रमाणात यशस्वी केल्याबद्दल सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांचे अभिनंदन करीत डॉ.राजेश इंगोले यांनी या पुढील काळात सुद्धा अशा बहारदार कार्यक्रमांचे आयोजन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावर्षी घेण्यात आलेल्या या स्पर्धा न भूतो न भविष्यती अशा प्रकारे आयोजित करण्यात आल्या आहेत असे गौरवोद्गार काढत आयएमए ही संघटना खऱ्या अर्थाने डॉक्टर्सच्या सुखदुःखात सदैव सहभागी असते असे प्रतिपादन केले. आमदार शेखर निकम यांनी डॉक्टर्स हे धरती वरील देव मानले जातात पण, वस्तुस्थितीत डॉक्टर्स ही सर्वसामान्य व्यक्ती असते. दैनंदिन ताणतणाव, प्रश्न, समस्या त्यालाही असतात त्यामुळे त्यांनाही या ताणतणावापासून मुक्ती हवी असते आणि या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनातून आणि समोर उपस्थित डॉक्टर्सची संख्या पाहता डॉ.राजेश इंगोले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हा हेतू साध्य केल्याचे दिसून येते. उपस्थित डॉक्टर्स आपआपल्या विषयांत तर तज्ज्ञ आहेतच पण, त्यांनी यावेळी ज्या कला सादर केल्या आहेत. त्यामुळे आम्हीही अचंबित झालो असल्याची प्रांजळ कबुली देत डॉक्टर्स ही उत्तम गायक, संगीतकार, फोटोग्राफर, चित्रकार, उत्कृष्ट नर्तक असू शकतात हे या कलादर्पण सांस्कृतिक सोहळ्याने दाखवून दिल्याचे मत व्यक्त केले. चिपळूण स्थानिक शाखेचे अध्यक्ष डॉ.यतीन जाधव यांनी चिपळूण शाखेला हा राज्यस्तरीय कलादर्पण सोहळा आयोजित करण्याचे सौभाग्य लाभले हा संपूर्ण चिपळूण आणि कोकणाचा बहुमान असल्याचे सांगत डॉ.रवींद्र कुटे आणि डॉ.राजेश इंगोले यांचे आभार मानले. यावेळी इंडीयन मेडीकल असोसिएशन तर्फे घेण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ.अमोल टकले व सुप्रसिद्ध सुत्रसंचालिका सखी पाटील यांनी केले. तर उपस्थितांचे आभार डॉ.सानप यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.कांचन मदार, डॉ.अब्बास जबले, डॉ.सानप, डॉ.अमोल टकले व स्थानिक शाखेच्या सर्व सदस्यांनी प्रयत्न केले.

# उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार सन्मान सोहळा

**अहेरी । प्रतिनिधी**

सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी वैभव वाघमारे यांच्या हस्ते एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी कार्यालयाच्या सभागृहामध्ये विविध क्षेत्रातील विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १७ कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट कर्मचारी, २ शिक्षकांना उत्कृष्ट शिक्षक व २ विद्यार्थ्यांना उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून सन्मानित करण्यात आले.

यापूर्वी सुद्धा प्रकल्पांतर्गत येणाऱ्या कर्मचारी, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांना त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले होते. ती परंपरा कायम ठेवीत यावेळी सुद्धा विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान समारंभ आयोजित करण्यात आला. त्यामध्ये उपविभागीय कार्यालय अहेरी अंतर्गत हमीद सय्यद, नायब तहसीलदार यांना त्यांच्या कामाप्रती कर्तव्यनिष्ठ व नेहमीच तत्पर असल्याबद्दल, संतोष दुर्गे कोतवाल यांना कार्यालयीन कामकाजाकरिता कार्यालयातील सर्वात उपयुक्त कर्मचारी म्हणून, तसेच विनोद दहागावकर कोतवाल यांना कार्यालयीन कामकाजाकरिता कार्यालयातील सर्वात उपयुक्त कर्मचारी म्हणून, मोनेश पाटील निवडणूक ऑपरेटर यांना कामाप्रती तीव्र आवड असल्याबद्दल, युवराज भीमटे कनिष्ठ लिपिक यांना एकाच वेळी अनेक




कामे हाताळण्याची क्षमता असल्याबद्दल, विनोद वैरागडे निवडणूक ऑपरेटर यांना स्वतः आपरेटर असूनही क्लर्क क्षमता इतके काम करू शकतात त्याबद्दल, चिरंजीव राऊत व दीपक दुर्गे कोतवाल यांना चांगल्या कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले.पंचायत समिती अहेरी येथील वैभव कवीश्वर विस्तार अधिकारी यांना त्यांच्या कामकाजाप्रती असलेल्या गांभीर्याबद्दल व त्यांच्या वर्तणुकीबद्दल गौरविण्यात आले. तसेच चंद्रकांत जुवारे नेटवर्क इंजिनियर यांना चांगल्या कार्याबद्दल, तसेच लक्ष्मण येर्रावार सामाजिक कार्यकर्ता यांना त्यांच्या सार्वजनिक हिताशी संबंधित बाबींचा सतत पाठपुरावा करण्याच्या क्षमतेबद्दल गौरविण्यात आले. सोबतच उपविभागीय कार्यालय एटापल्ली अंतर्गत अनिल राठोड महसूल सहाय्यक यांना त्यांच्या कामातील सुव्यवस्थितपणाबद्दल तसेच मारोती कुडमेथे अव्वल कारकून यांना उत्तम प्रकारे कामकाज सांभाळत असल्याबद्दल,मालती बंदूकवार अव्वल कारकून यांना हाताळत असलेल्या कामकाजाची अद्यावत माहिती असल्याबद्दल तसेच पराग खोब्रागडे यांना उत्तेजनार्थ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अहेरी अंतर्गत कपिल शर्मा वरिष्ठ लिपिक यांना त्यांच्या कार्याप्रति असलेल्या अतिव निष्ठेबाबत तसेच आजवर शासकीय कार्यालयांमधील पाहिलेल्या कर्मचाऱ्यांपैकी सर्वोत्कृष्ट कर्मचारी असल्याबद्दल, तसेच दत्तात्रय सूर्यवंशी प्राथमिक शिक्षक गुड्डीगुडम यांना गणितातील मूलभूत संबोध विद्यार्थ्यांमध्ये विकसित केल्याबद्दल तसेच खुशालचंद दिवसे प्राथमिक शिक्षक संत मानव दयाल प्राथमिक शाळा अहेरी यांना भाषा विषयात विद्यार्थ्यांमधील वाचन-लेखन क्षमतांचा विकास केल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. सोबतच सचिन रामटेके वाहन चालक यांना उत्तम वाहन चालविण्याच्या कौशल्याबाबत व वेळेचे काटेकोरपणे पालन केल्याबद्दल गौरविण्यात आले. शैक्षणिक सत्र २०२२-२३ मधील इयत्ता दहावीतील प्रकल्पामधून प्रथम असलेला मुलाजी आडवे कुमोटी या विद्यार्थ्यास तसेच विभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये प्लेयर ऑफ द टूर्नामेंट ठरलेला निकेश दूलसा कुडयेटी या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. सर्व सत्कारमूर्ती कर्मचारी, शिक्षक तथा विद्यार्थी यांना सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी वैभव वाघमारे यांनी प्रशस्तीपत्र, पुस्तक, वैयक्तिक डायरी व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. तसेच आपण सगळे सत्कारमूर्ती हिरे असून आपली चमक दिवसागणिक वाढवीत ठेवावी व आपल्या क्षेत्रात यापुढेही दौदीप्यमान कार्य करीत रहावे अशा भरभरून शुभेच्छा दिल्या.

# तालुकास्तरावर प्रथमच होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेला सुधीर मुनगंटीवार यांनी भव्यता आणली : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## चंद्रपुरातून घडतील भविष्यातील ऑलिम्पिकपटू : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





**बल्लारपूर ( चंद्रपूर)**

येथे राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन संपन्न

चंद्रपूर: देशात कोणत्याही क्रीडा स्पर्धा तालुकास्तरावर होण्याचा हा पहिला प्रसंग आहे. परंतु राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतला आणि ६७व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धांना भव्यता प्राप्त झाली, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले.बल्लारपूर येथील विसापूर तालुका क्रीडा संकुलात ६७ व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वने व सांस्कृतिक कार्य तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार रामदास आंबटकर, अप्पर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, प्रधान सचिव विकास खारगे, सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभिषण चावरे, पद्मश्री बहादूरसिंह चव्हाण, क्रीडापटू हिमा दास, ललिता बाबर, बॅडमिंटनपटू मालविका बनसोड, वनविकास महामंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंग चंदेल,भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, माजी महानगर अध्यक्ष डॉ.मंगेश गुलवाडे, जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधीक्षक रवींद्र परदेशी यावेळी उपस्थित होते.

आपल्या संबोधनात मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्यामुळे क्रीडा क्षेत्रात क्रांतिकारी बदल झाले आहेत. त्याचेच अनुकरण राज्य सरकार करीत आहे. कोणत्याही तालुक्याच्या ठिकाणी राष्ट्रीय स्पर्धा आयोजित होण्याचा हा पहिला प्रसंग आहे. या आयोजनाला ना. सुधीर मुनगंटीवार यांनी भव्यदिव्यता आणली. त्यामुळे चंद्रपुरातील भूमितून आगामी काळात ऑलिम्पिकपटू तयार झाल्यास आश्चर्य वाटणार नाही. चांगल्या कामांबाबत ना. सुधीर मुनगंटीवार नेहमीच आग्रही असतात, याचा आनंद वाटतो, असेही गौरवोद्गार त्यांनी काढले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणादरम्यान राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी ना. सुधीर मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त केले. चंद्रपूर जिल्हा हा वाघ आणि साग साठी प्रसिद्ध आहे. या दोन्हीवर कोणत्याही प्रतिकूल वातावरणाचा परिणाम होत नाही. चंद्रपुरातील खेळाडूही तसेच कणखर आहेत. भविष्यात चंद्रपूर जिल्ह्यातील खेळाडू ओलंपिक खेळण्यासाठी नक्कीच यशस्वी होतील अश्या शुभेच्छाही दिल्या.

क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनीही आपल्या भाषणात ना. सुधीर मुनगंटीवार राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धांबद्दल सुरुवातीपासून आग्रही होते असे सांगितले. स्पर्धेचे आयोजन, सूक्ष्म नियोजन सुधीरभाऊंनी स्वत: पुढाकार घेत केले. सांस्कृतिक कार्य विभागाचे कार्यही त्यांच्यामुळे वेगाने सुरू आहे. महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या निमित्ताने व आता क्रीडा स्पर्धांच्या निमित्ताने आपल्याला ना. मुनगंटीवार किती सूक्ष्म नियोजन करतात हे बघायला मिळाले, असेही बनसोडे म्हणाले.सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानीस्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यानंतर भव्यदिव्य सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. या विशेष कार्यक्रमाने मान्यवर व उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. गायिका शाल्मली खोलगडे यांच्या 'लाइव्ह परफॉर्मन्सने' रंगत आणली. फायर शो, लेझर शो, क्रोबॅटिक डान्स मुख्य आकर्षण ठरले.

अभूतपूर्व सोहळा एक शाम खिलाडियो के नाम, शिववंदना, गणेश वंदन, महाराष्ट्राची लोकधारा, कलर्स ऑफ इंडिया आदी कार्यक्रमांच्या आयोजनाने स्पर्धा अभूतपूर्व ठरणार आहे. स्पर्धेचे प्रसिद्ध 'थीम साँग' 'आओ चंद्रपूर खेलो चंद्रपूर'ला प्रसिद्ध पार्श्वगायक कैलास खेर यांचा आवाज आहे. प्रसिद्ध अभिनेते सलमान खान, आमिर खान यांनीही सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत. खेळाडूंचा फ्लॅग मार्च राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी बल्लारपूर येथे दाखल झालेल्या सर्व राज्यातील खेळाडूंनी शिस्तबद्ध पध्दतीने फ्लॅगमार्च करीत आपापल्या राज्याचे दर्शन घडविले. या स्पर्धेसाठी संपूर्ण देशभरातून जवळपास १ हजार ६०० खेळाडू चंद्रपुरात दाखल झाले आहेत.गॅझेटिअर व 'ग्लोरी ऑफ चंद्रपूर'चे प्रकाशन राज्याचे सांस्कृतिक मंत्री आणि चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून पहिल्यांदाच चंद्रपूर जिल्ह्याचे 'गॅझेटिअर' मराठी भाषेत प्रकाशित करण्यात आले. या 'गॅझेटिअरचे' तसेच येथे आलेल्या खेळाडूंना चंद्रपूर जिल्ह्याचा ऐतिहासिक, सांस्कृतिक वारशाची माहिती व्हावी, या उद्देशाने हिंदी आणि इंग्रजी भाषेत तयार करण्यात आलेल्या 'ग्लोरी ऑफ चंद्रपूर' या माहिती पुस्तिकेचे प्रकाशनही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, क्रीडामंत्री संजय बनसोडे आणि पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

### चंद्रपूरचा डंका वाजत असल्याचा आनंद : ना.सुधीर मुनगंटीवार

**ना. श्री. मुनगंटीवार म्हणाले की, देशातील सर्वाधिक वाघ चंद्रपुरात आहेत.अयोध्येतील श्रीराम मंदिरातील दरवाज्याला वापरलेले सागवान लाकूडही चंद्रपूर जिल्ह्यातील आहे. क्षेत्र कोणतेही असो चंद्रपूरचे नाव येतेच. त्यामुळे आगामी काळात ऑलम्पिक मध्ये चंद्रपूर जिल्ह्याचे नावलौकिक होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने चंद्रपुरात 'मिनी भारत'चे दर्शन घडत आहे. स्पर्धांच्या यशस्वीतेसाठी जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांनी केलेल्या नियोजनाचेही मा. ना. मुनगंटीवार यांनी कौतुक केले. देशगौरव पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या मार्गदर्शनात २०३६ मध्ये होणाऱ्या ओलिम्पिक स्पर्धेत देशातील कोहिनुररूपी खेळाडू सर्वाधिक पदके प्राप्त करतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.**

# अ.भा.ग्रा.पत्रकार संघाचे ४ जानेवारीला एक दिवसीय अधिवेशन


## जळगाव (जामोद) येथे आयोजन,राज्यभरातील पत्रकार होणार सहभागी

**जळगाव । प्रतिनिधी**

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे एकदिवसीय खुले राज्यस्तरीय अधिवेशन गुरुवार ४ जानेवारी २०२४ रोजी जळगाव (जामोद) येथील बऱ्हाणपूर रोडवर असलेल्या देवाशिष लॉन्स येथे आयोजित केले आहे. या अधिवेशनाचे आयोजक अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ (भारत) असुन संयोजक आम्ही जळगांवकर पत्रकार आहे.







या अधिवेशनाच्या प्रथम सत्रात सकाळी १० ते दुपारी १ वाजतापर्यंत उद्घाटन समारंभ होणार आहे. याचे उद्घाटक माजी मंत्री, आमदार डॉ. संजय कुटे यांच्या हस्ते होणार आहे. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय संवाद व माहिती तंत्रज्ञ समिती भारत सरकारचे अध्यक्ष खासदार प्रतापराव जाधव, प्रमुख उपस्थिती म्हणून खामगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार आकाश फुंडकर, राज्य पत्रकार अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष तथा दै. लोकमत मुंबईचे सहयोगी संपादक यदु जोशी, विशेष उपस्थिती म्हणून आय.एन.एस. समितीचे कार्यकारी सदस्य तथा दै. हिन्दुस्थानचे प्रबंध संपादक विलास मराठे, अमरावती विभागीय अधिस्विकृती समितीचे सदस्य तथा दै. वृत्तकेसरी अमरावतीचे संपादक जयराम आहुजा आदींची उपस्थिती राहणार आहे. तर व्दितीय सत्र दुपारी २.३० वाजता ते ४ वाजतापर्यंत होणार आहे. या सत्राला प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या सचिव डॉ. स्वाती संदिप वाकेकर, कृ.उ.बा. जळगावचे सभापती प्रसेनजीत पाटील, राजर्षी शाहु परिवार तथा संकल्पक वन बुलढाणा मिशनचे अध्यक्ष संदिप शेळके, दै. महासागरचे संपादक श्रीकृष्ण चांडक, अमरावती विभागीय अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष रवींद्र लाखोडे, नागपूर विभागीय अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष रमेश कुळकर्णी, अमरावती विभागीय अधिस्विकृती समिती सदस्य राजेंद्र काळे बुलढाणा, सुरेंद्रकुमार आकोडे, गोपाल हरणे यांची उपस्थिती राहणार आहे. तर समारोपीय सत्र हे दुपारी ४ ते दु. ५ वाजतापर्यंत राहणार आहे. या सत्राच्या अध्यक्षस्थानी अ.भा. ग्रामीण पत्रकार संघाचे केंद्रीय अध्यक्ष मनोहर सुने राहणार असुन प्रमुख उपस्थिती म्हणून अ. भा. ग्रामीण पत्रकार संघाचे केंद्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान यांची उपस्थिती राहणार आहे. यादरम्यान अधिस्विकृती बाबत मार्गदर्शन व आजची पत्रकारीता या विषयावर राज्य पत्रकार अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी हे मार्गदर्शन करणार आहे.तरी या अधिवेशनाला राज्यातील सर्व पत्रकार बंधुनी उपस्थित राहावे असे आवाहन संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने, केंद्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान, केंद्रीय महासचिव सुरेश सवळे, केंद्रीय सचिव अशोक पवार, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख, महिला मंच प्रदेश अध्यक्ष जयश्री पंडागडे, केंद्रीय उपध्यक्ष राजेंद्र भुरे , केंद्रीय कोषाध्यक्ष अशोक यावूल, केंद्रीय सदस्य माणिक ठाकरे, प्रदीप जोशी, केंद्रीय विधी सल्लागार ड. किरण भुते, केंद्रीय संपर्क प्रमुख प्रा. रवींद्र मेंढे, केंद्रीय सदस्य बाळासाहेब सोरगीवकर, संजय कदम , मीना राहिज, जोशीला पगारीया, वर्षा घाडगे, कांचन मुरके , भावना सरनाईक , अनुप गवळी , प्रताप मोरे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष व अ. भा. ग्रा. पत्रकार संघ, जळगाव (जामोद) कार्यकारीणी - जळगांवकर पत्रकार यांनी केले आहे. सदर अधिवेशनामध्ये राज्यभरातील पत्रकार बांधव सहभागी होणार असल्याची माहिती अ. भा. ग्रा. पत्रकार संघाचे प्रसिध्दी प्रमुख शहजाद खान , सागर सवळे, महाराष्ट्र प्रदेश संपर्कप्रमुख रवींद्र तिराणिक यांनी दिली आहे.

# अफरोज शेख नेपाळमध्ये फुटबॉल खेळणार



**कोरपना । प्रतिनिधी**

कोरपना तालुक्यातील जिल्हा स्मार्ट ग्राम, बिबी येथील अफरोज रहीम शेख या तरुणाची नेपाळमधील पोखारा येथे होणाऱ्या राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

आदित्य बिर्ला पब्लिक स्कूल आवारपूरचा तो इयत्ता बारावीचा विद्यार्थी आहे. युवा फुटबॉल स्पोर्टिंग असोसिएशन, वणी या संघाकडून तो खेळणार असून नेपाळला जाण्यासाठी आज (दि. २८ ला) रवाना झाला आहे. हैद्राबाद येथे झालेल्या फुटबॉल स्पर्धेत त्याने आपल्या खेळाची चुणूक दाखवली होती. विदेशात खेळण्यासाठी त्याच्या निवडीबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# अजय कंकडालवार यांच्या हस्ते कब्बड्डी व व्हॉलीबॉल स्पर्धेचे उदघाटन

**एटापल्ली । प्रतिनिधी**

तालुक्यातील गेदा येथील जय जगदंबा क्रीडा मंडळ गेदा यांच्या सौजन्याने भव्य ग्रामीण कब्बड्डी - व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या कब्बड्डी - व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी आवीस कॉंग्रेसचे नेते व माजी जि.प.अध्यक्ष अजयभाऊ कंकडालवार यांच्या कडून प्रथम पारितोषिक देण्यात आला सदर या कब्बड्डी व्हॉलीबॉल स्पर्धेचे उदघाटन माजी जि.प.अध्यक्ष तथा विद्यमान अहेरी बाजार समिती सभापती अजय कंकडालवार यांच्या शुभ हस्ते पार पडला आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आविसंचे एटापल्ली तालुका अध्यक्ष नंदूभाऊ मट्टामी - सहउदघाटक म्हणून आविसं एटापल्ली तालुका सचिव प्रज्वल नागूलवार आणि गेदा ग्रामपंचायतचे सदस्य रमेश वैरागडे होते.



यावेळी उपस्थित अनिल करमरकर बाजार समिती संचालक,रमेश वैरागडे ग्रा.पं सदस्य गेदा,सरिता मट्टामी ग्रामपंचायत सदस्य गेदा,हरीश पदा माजी ग्रा.पं सरपंच गेदा,हरीश गावडे उपसरपंच देवलमरी,महेश लेकुर ग्रा.पं.सदस्य देवलमरी, प्रशांत तेलकुंटवार सचिव आ.वि.का.सह.संस्था गेदा,सोमजी गावडे,धर्मा मट्टामी,श्रीनिवास राऊत,नरेंद्र गर्गम,मुकेश पदा पो.पा. गेदा दसरू पदा गाव भुमिया,जगन्नाथ मडावी माजी उपसरपंच देवलमरी,मिलिंद भांडेकर,अरविंद गव्हारे, मंडळाचे अध्यक्ष संतोष कोरामी, उपाध्यक्ष अजय गावडे,सचिव अरूण पदा,चैतू पुंगाटी,शंकू पदा,कोषाध्यक्ष सादुजी पदा,अजय गुंदरू,कैलास पुंगाटी,दिनेश नरोटे,महेंद्र गोटा,दिवाकर कुळ्येटी,मंडळ : सर्वश्री - रवि कोंदामी,कालिदास कोंदामी,आकाश कोंदामी,नरेश गुंडरू,नानेश नरोटे,नामदेव गुंडरू,नितेश हलामी,सुरज नरोटे,राहूल गोटा,अनिल पदा,उमेश पदा,अशोक गावडे,रमेश गावडे, निखिल पुंगाटी,अजय बा.वडे,नागेश पदा,स्वराज पुंगाटी,संदिप गावडे,जाकेश गावडे,किशोर पुंगाटी,विजू गावडे,योगेश कुळयेटी,संतोष कुळयेटी,ईश्वर गावडे,अनिल पदा,सदाशिव पदा,रंजीत पुंगाटी,मंगेश गोटा,नानेश कोरामी,रोहीत कुळयेटी,राम कोरामी,रिखी कुळयेटी,रोशन पदा,निलेश पदा,करण पदा,राजू पदा,रोहीत पदा,सुरेश आलाम,रंजित गुंडरु,अंकुश गुंडरू,कुशवंत हलामी, प्रविण गुंडरू,दिनेश हलामी,महेंद्र मडावी,विक्की पुंगाटी,रोशन पदा,अंकुश पदा,आकाश पदा,विशाल पदा,अशोक गुंडरू,प्रविण गुंडरू,आशिष गोटा,राहूल पदा,अजय पदा,साईनाथ गावडे,गणेश गोटा,मोरेश्वर पुंगाटी,सम्मा हलामी,टिबु पुंगाटी,करण पदा,गुलशन भांडेकर,गणेश कुनघाडकर,अनिकेत कुंकलवार,अजय भांडेकर,उपेश नरताम,चंद्रकांत भांडेकरसह आविसं कॉंग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच गावातील नागरिक उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .